# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

## ५वी प्रवेशचाचणीविषयी पालकांना सूचना

१. विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या सत्रानुसार चाचणीपूर्वी ३० मिनिटे हजर राहावे. सत्राची वेळ प्रवेशपत्रावर पाहावी. चाचणीच्या दोन फेऱ्या त्याच दिवशी असतील.

**फेरी १: स.** ११.३० ते १.३०

**फेरी २: दु. २.०० ते ४ .००**

२. **मंगळवार दि. १३** मे चाचणीच्या वेळी येताना प्रकाशचित्र लावलेले ओळखपत्र, काळ्या रंगाचे दोन बॉलपेन्स आणावेत. दुसऱ्या चाचणीसाठी टोक केलेल्या दोन पेन्सिली, खोडरबर, टोकयंत्र आणि दोन काळे बॉलपेन्स आणावे.

३. योग्य रांगेत योग्य क्रमांकावर बसवून घेण्यासाठी विद्यार्थ्याला त्याच्या प्रवेशपत्रावरील **गटक्रमांक** आणि **आसनक्रमांक** चांगल्या प्रकारे लक्षात असणे आवश्यक आहे . **तसेच** त्या विद्यार्थ्या**चे प्रवेशपत्र त्याच्याजवळ असणे आवश्यक आहे.**

४. पालकांनी विद्यार्थ्यांच्या हातात आवश्यक साहित्य व प्रवेशपत्र देऊन त्याला दिलेल्या परीक्षा केंद्रावर सोडल्यानंतर चाचणी संपेपर्यंत विद्यार्थ्याची सर्व काळजी प्रबोधिनीतील अध्यापक आणि कार्यकर्ते घेत असतात. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या सत्रानुसार रांगांमध्ये बसवून घेतले जाते आणि नंतर एकेका गटाला रांगेने चाचणीसाठी वर्गात नेले जाते. पालकांनी शाळेच्या आवारात थांबू नये.

५. पालकांना वर्गात जाण्यास अनुमती नसते. त्यांच्यासाठी प्रबोधिनी शिक्षण पद्धतीची ओळख व्हावी यासाठी व्याख्यान योजलेले असते.

६. चाचणी संपल्यानंतरही विद्यार्थ्यांना रांगेने तळमजल्यावर नेले जाते. आपल्या पाल्यास घेऊन जाण्यासाठी पालकांनी पाल्याला सोडलेल्या दारापाशी यावे.

७. उत्तरपत्रिका संगणकाद्वारे तपासली जाणार असल्याने विद्यार्थ्यांना योग्य उत्तराच्या ठिकाणी काळ्या शाईच्या बॉलपेनाने गोल भरावयाचा आहे. त्याचा सराव विद्यार्थ्यांकडून अवश्य करून घ्यावा. नमुन्यादाखल खाली उत्तर पत्रिका दाखविली आहे.


प्रज्ञा मानस संशोधिका
ज्ञानप्रबोधिनी
510, सदाशिव पेठ, पुणे, 30.

नाव : मिलिंद मंदार नाईक दिनांक : 02/02/13

उत्तरे भरण्यासाठी सूचना
1) आपले उत्तर शेजारी दिलेल्या उदाहरणाप्रमाणे भरावे.
2) प्रत्येक प्रश्नाचे एकच उत्तर बरोबर आहे व एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही.
3) गोल काळा करण्यासाठी काळ्या रंगाच्या बॉलपेनचा वापर करा. काळा केलेला गोल बदलण्याचा प्रयत्न करू नका.
4) कृपया पूर्ण गोल काळा करा, पेन्सिलचा वापर करू नका.
5) कृपया उत्तरपत्रिकेवर कच्चे काम आणि खाडाखोड करू नका.
6) आधी काळा केलेला गोल पुसण्यासाठी खोडरबर किंवा व्हाईटनर चा उपयोग करू नका.
7) एका उत्तराला एकापेक्षा जास्त गोल काळे केल्यास ते चुकीचे धरले जाईल आणि त्याला गुण दिले जाणार नाहीत.

चुकीच्या पद्धती
योग्य पद्धत

क्रमांक: 1 2 3 0 4

Example: X = (A) ● (C) Y = (A) (B) ●

## ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

### ५वी प्रवेश चाचणीचे तपशील

| | |
|---|---|
| | **चाचणी** |
| **परीक्षा केंद्र :** | **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे ३०** |
| **चाचणीचे विषय :** | मानसशास्त्रीय चाचणी |
| **परीक्षेचे माध्यम :** | मराठी किंवा इंग्रजी |
| **वेळ :** | एकूण सुमारे ४ तास |
| **स्वरूप :** | वस्तुनिष्ठ , बहुपर्यायी , छोट्या कालावधीच्या अनेक चाचण्या |
| **साहित्य :** | काळ्या रंगाचे दोन बॉलपेन्स, दोन पेन्सिलस् , खोडरबर, टोकयंत्र |
| चाचणीचा दिवस : | **मंगळवार, दि. १३ मे २०२५** |
| वेळ : | फेरी १: स. ११.३० ते १.३० |
| | फेरी २: दु. २.०० ते ४ .०० |
| निकाल : | **संकेतस्थळावर** |